**NRHM च्या धर्तीवर अंगणवाडी केंद्रातील सेवांवर लोकाधारित देखरेख व कृती ही प्रक्रीया प्रायोगिक तत्त्वावर राबविणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्र.- एबावि-२०१३/ प्र.क्र. ५२ / का-५
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
**दिनांक :- १३ जून , २०१३**

**प्रस्तावना :-** राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन (NRHM) अंतर्गत "आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख व नियोजन' ही संकल्पना राबविली जात आहे. त्याच धर्तीबर महिला व बाल विकास विभाग च्या **"एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत लोकाधारित देखरेख व कृती'** (community based monitoring & action related to ICDS - ही प्रक्रिया राज्यातील नंदुरबार, अमरावती, नागपूर, गडचिरोली, पुणे, परभणी व मुंबई जिल्ह्यांतील अंगणवाडी केंद्रात प्रायोगिक तत्वावर स्थानिक स्वयंसेवी संस्थामार्फत राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :-

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशनच्या धर्तीवर, एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत लोकाधारित देखरेख व कृती प्रायोगिक तत्वावर गडचिरोली, अमरावती, नंदुरबार, पुणे, नागपूर, परभणी व मुंबई या जिल्हयातील काही भागात एका वर्षासाठी विनामुल्य तत्वावर राबविण्यात यावी, असा निर्णय शासनाने घेतला आहे. याची उदिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

- एकात्मिक बाल विकास योजनेमध्ये देण्यात येणाऱ्या सेवांचे अधिकार याबद्दल जनतेमध्ये जागृती निर्माण करणे. जनतेत अंगणवाडी केंद्रात देण्यात येणा-या सेवासंदर्भात हक्काधारित समज विकसित करणे.
- बाल विकास सेवांच्या लाभार्थ्यांमध्ये पालकत्त्वाची भावना वाढीस लागावी याकरिता प्रयत्न करणे. एकात्मिक बाल विकास सेवांच्या नियोजनात लोकसहभाग मिळवणे. याकरिता विविध प्रकारच्या पद्धती विकसित करणे.
- लोकाधारित देखरेख व कृती कार्यक्रमांमार्फत एकात्मिक बाल विकास सेवा पुरवणाऱ्या यंत्रणेमध्ये जनतेप्रती उत्तरदायित्व वाढीसाठी प्रयत्न करणे.
- विविध स्वयंसेवी संस्था/ संघटनांनी हक्काधारित दृष्टिकोनातून आरोग्य तसेच अन्न सुरक्षेसंदर्भात सुधारणा घडवण्यासाठी काही नावीन्यपूर्ण प्रयत्न/प्रयोग केले आहेत. त्यानुसार विकसित झालेली उपयुक्त माध्यमे, अंगणवाडी केंद्रातील सेवांवर लोकाधारित देखरेख करण्यासाठी वापरणे व नवीन माध्यमे विकसित करणे. या माध्यमांचा व्यापक पातळीवर अवलंब करणे.

२. एकात्मिक बाल विकास सेवा योजना तसेच आरोग्यसेवा संबंधित, हितसंबंधी गटांचे प्रतिनिधित्व असलेल्या समित्यांतर्फे ही देखरेख प्रक्रिया विविध टप्प्यांवर राबवली जाईल (उदा. गाव/शहर, तालुका, जिल्हा व राज्य). या प्रक्रियेत आरोग्यसंदर्भात सुरू असलेल्या देखरेख व नियोजन प्रक्रियेतील विविध स्तरावरील समित्यावरील पंचायत सदस्य, जनतेच्या हक्कांसाठी कार्यरत जनसंघटना, स्वयंसेवी संस्था, बचत गटांचे प्रतिनिधी, एकात्मिक बाल विकास सेवा

योजनेचे अधिकारी व कर्मचारी, तसेच अंगणवाडी केंद्रात पुरविण्यात येणा-या सेवांच्या लाभार्थ्यांचे पालक व गावकरी सहभागी होतील. विशेषत: हक्काधारित दृष्टिकोनातून समाजकार्य करणाऱ्या संस्था/ संघटनांचे प्रतिनिधित्व या प्रक्रियेत अत्यंत महत्त्वाचे आहेत.

या पथदर्शक प्रकल्पासाठी निवडलेल्या जिल्ह्यातील गावस्तरावर अंगणवाडी, तालुका, जिल्हा व राज्य स्तरावर देखरेखीसाठी विविध उपक्रम हाती घेतले जातील. सध्या अंगणवाडी केंद्रातील सेवांवर लोकाधारित देखरेख पथदर्शी प्रक्रिया खालील प्रकारे राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

३. सदरचा उपक्रम राबविण्यासाठी " साथी-सेहत " पुणे ही स्वयंसेवी संस्था महाराष्ट्रातील १३ जिल्ह्यांमध्ये NRHM अंतर्गत आरोग्यसेवांवर लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रियेत राज्य नोडल संस्था म्हणून कार्यरत आहे. त्याच धर्तीवर एकात्मिक बाल विकास योजनेतील सेवांवरील देखरेख प्रक्रियेतही " साथी-सेहत " संस्थेस राज्य नोडल संस्था म्हणून मान्यता देण्यात येत आहे. या प्रक्रियेतील राज्य स्तरावरील उपक्रमांचे आयोजन, राज्य पातळीवर महिला व बाल विकास विभाग अधिका-यांबरोबर समन्वय, प्रक्रियेसाठी उपयुक्त साहित्य निर्मीतीची जबाबदारी **साथी-सेहत** कडे असेल. तसेच प्रक्रियेत सहभागी असलेल्या जिल्हास्तरावरील संस्था/ संघटनांसोबत सल्ला-संसाधन सहाय्याचे कार्य या संस्थेमार्फत केले जाईल.

४. ग्रामीण भागात देखरेख प्रक्रियेच्या बळकटीकरणासाठी जिल्हा ते गाव पातळीवरील उपक्रम राबविण्यासाठी खालील संस्थांना मान्यता देण्यात येत आहे. या संस्था जिल्हा पातळीवरील प्रशिक्षणांचे आयोजन, माहिती संकलन, गाव ते जिल्हा स्तरापर्यंत समन्वय, जन संवाद/जन सुनवाई यासारख्या विविध उपक्रमांत जिल्ह्यातील एकात्मिक बाल विकास सेवा योजनेची यंत्रणा, अंगणवाडी केंद्रातील लोकाधारित देखरेख प्रक्रिया राबवण्यासाठी या संस्थांना सर्वतोपरी मदत करेल.

**जिल्हा नोडल संस्थांची मान्यता :-**

| जिल्हा /शहर | तालुका व त्यातील गांवे | नोडल संस्था |
|---|---|---|
| गडचिरोली | कुरखेडा तालुक्यातील १५ गांवे | आम्ही आमच्या आरोग्यासाठी |
| अमरावती | चिखलदरा व धारणी तालुक्यातील १५ गांवे | खोज |
| नंदुरबार | धडगाव तालुक्यातील १५ गांवे | जनार्थ आदिवासी विकास संस्था |
| पुणे | वेल्हे तालुक्यातील १५ गांवे | रचना सामाजिक पुनर्बांधणी संस्था |
| नागपूर | कमी उत्पन्न असलेली लोकवस्ती नागपूर शहर (पूर्व) मधील हनुमान नगर झोन व रेशीमबाग झोन मिळून २२ अंगणवाडी केंद्र | आम्ही आमच्या आरोग्यासाठी |
| परभणी | सेलू तालुक्यातील १५ गावे | परभणी जिल्हयात NGO चा प्रस्ताव उपलब्ध नसल्याने साथी सेहत, पुणे या राज्य नोडल संस्थेने योग्य ती व्यवस्था करावी. |
| मुंबई | कमी उत्पन्न असलेली लोकवस्ती (बैगनवाडी हेल्थ पोस्ट) मधील २७ अंगणवाडी केंद्र | लोक सेवा संगम |

५. या उपक्रमाची यशस्वीपणे अंमलबजावणी होण्यासाठी महिला व बाल विकास विभाग / एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे अधिकारी /कर्मचारी व संस्थांच्या प्रतिनिधींची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील.

**<u>महिला व बाल विकास विभाग/एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे अधिकारी /कर्मचारी यांच्या जबाबदाऱ्या -</u>**

- प्रक्रियेस आवश्यक सर्व प्रकारची माहिती प्रक्रियेत सहभागी संस्था-संघटनांच्या कार्यकर्त्यांना, समिती सदस्यांना देणे.
- प्रक्रियेअंतर्गत विविध स्तरावर होणाऱ्या आढावा बैठकांमध्ये उपस्थित राहणे.
- बैठकीमध्ये उपस्थित झालेल्या मुद्यांवर योग्य ती कार्यवाही करणे.
- अधिकाऱ्यांनी त्यांच्या अखत्यारित असलेल्या कर्मचाऱ्यांना योग्य ते निर्देश देणे.
- प्रक्रियेअंतर्गत घेण्यात येणाऱ्या जनसुनवाई/ जनसंवाद कार्यक्रमामध्ये उपस्थित राहणे.
- संपूर्ण प्रक्रियेत सकारात्मक सहकार्य करणे.

**<u>संस्थांच्या प्रतिनिधींच्या जबाबदाऱ्या :-</u>**

- देखरेख प्रक्रियेत सर्व उपक्रम राबवण्यासाठी पुढाकार घेणे.
- प्रक्रियेअंतर्गत मुद्दे उपस्थित करतांना सकारात्मक सूचना देणे.
- अधिकारी व कर्मचाऱ्यांना सन्मान देणे.
- संवादातून सुधारणा घडवण्यासाठी प्रयत्नशील राहणे.

६. या उपक्रमाची अंमलबजावणी गांव (वस्ती) / बीट / तालुका/ शहरी प्रकल्प/ जिल्हा व राज्यस्तरावर खालीलप्रमाणे करण्यात येईल.

**(अ) गांव (वस्ती) पातळीवरील समितीची रचना, त्यांचे उपक्रम पुढीलप्रमाणे राहतील :-**

वस्ती पातळीवर एकात्मिक बाल विकास सेवा योजनेवर लोकाधारित देखरेख व कृती कार्यक्रमासाठी वस्ती पातळीवर देखरेख व नियोजन समिती रचना पुढीलप्रमाणे असेल :-

- **वस्तीपातळीवरील समिती**
  - अंगणवाडी पर्यवेक्षिका/मुख्यसेविका
  - माता समिती प्रतिनिधी
  - शहर समन्वय संस्थेचे प्रतिनिधी
  - प्रत्येक माता समितीचे किमान १ सदस्य
  - अंगणवाडी सेविका (वार्डातील सर्व)
  - पालकांचे प्रतिनिधी
  - प्रत्येक बचतगट, आरोग्य निधी, महिलामंडळ किंवा महिला संघटनेचे एक-एक प्रतिनिधी
  - वस्तीपातळीवर सक्रिय मंडळ /संघटना यांचे दोन प्रतिनिधी

**वस्ती पातळीवर लोकाधारित देखरेख प्रक्रियेअंतर्गत घ्यायचे उपक्रम**

- वस्तीपातळीवर वेळोवेळी जनजागृती अभियान घेणे.
- पथदर्शी प्रक्रियेच्या क्षेत्रातील सर्व पातळीवरील समित्यांच्या सदस्यांचे एकात्मिक बाल विकास सेवा योजनेवर लोकाधारित देखरेख प्रक्रियेविषयी प्रशिक्षण घेणे.
- वस्ती पातळीवरील समिती सदस्यांच्या मदतीने दर दोन महिन्यातून अंगणवाडीची माहिती गोळा करणे.

➢ वस्ती पातळीवरील समितीची बैठक दर दोन महिन्यातून एकदा घेणे.

➢ वस्ती पातळीवर लोकसहभागातून गरजेनुसार पोषण सुधारण्यासाठी वेगवेगळ्या कृती कार्यक्रमाचे आयोजन करणे.

**(ब) बीट पातळीवर लोकाधारित देखरेख प्रक्रियेअंतर्गत करायचे उपक्रम :-**

- एकात्मिक बाल विकास सेवा योजनेसंदर्भात देखरेख प्रक्रियेतून उपस्थित झालेल्या मुद्यांवर बीट पातळीवर दर तीन महिन्यतून एकदा संबंधित अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका, तालुका पातळीवर देखरेख प्रक्रियेतील सहभागी समन्वय संस्थेचे प्रतिनिधी व बीट अंतर्गत गावांमधील ग्रामीण, आरोग्य, पोषण, पाणी व स्वच्छता समितीच्या काही प्रतिनिधींसोबत बैठक आयोजित करण्यात येईल. या बैठकांचे दिवस व कार्यक्रमपत्रिका तालुका पातळीवरील समन्वय संस्था व ICDS च्या अंगणवाडी पर्यवेक्षिका किंवा संबंधित अधिकारी यांच्याशी समन्वय करुन ठरविणे.

**(क) तालुका (ग्रामीण भाग) पातळीवरील लोकाधारित देखरेख प्रक्रियेअंतर्गत करायचे उपक्रम-**

- तालुका पातळीवर एकात्मिक बाल विकास सेवा योजनेवर लोकाधारित देखरेख व कृती प्रक्रियेच्या सुरुवातीला कार्यशाळेचे आयोजन करणे. या कार्यशाळेत संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी तसेच तालुका वैद्यकीय अधिकारी यांना निमंत्रित करणे.
- एकात्मिक बाल विकास योजनेवर लोकाधारित देखरेख व कृती प्रक्रियेअंतर्गत चर्चा करण्यासाठी वर्षातून किमान तीन वेळा तालुका देखरेख व नियोजन समितीच्या बैठका आयोजित करणे. या बैठकांचे दिवस व कार्यक्रम पत्रिका तालुका पातळीवरील बाल विकास प्रकल्प अधिकारी व तालुका समन्वय संस्था यांच्या समन्वयातून ठरवणे.

या प्रक्रियेचा एक भाग म्हणून गाव ते तालुका स्तरावर ICDS योजनेच्या यंत्रणेसोबत जाहीर मांडणी व चर्चा करण्यासाठी तालुका समन्वय संस्था, तालुका स्तरावर वर्षातून एकदा जनसुनवाई / जनसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करतील. जनसुनवाईमध्ये ICDS योजनेचे जिल्हा व तालुका(प्रकल्प) पातळीवरील संबंधित अधिकारी, अंगणवाडी पर्यवेक्षिका तसेच आरोग्य विभागाचे तालुका पातळीवरील अधिकारी, स्वयंसेवी संस्था/संघटनांचे प्रतिनिधी, संबंधित पंचायतराज संस्थांचे प्रतिनिधी व ग्रामस्थ उपस्थित राहतील. जनसुनवाई/ जनसंवादातून पुढे आलेल्या मुद्यांवर चर्चा करून उपाययोजना करण्यासाठी तालुका पातळीवरील देखरेख व नियोजन समित्यांसोबत एक महिन्याच्या आत आढावा बैठका आयोजित करण्यात येतील. या बैठकांना समिती सदस्यांव्यतिरिक्त अंगणवाडी केंद्रातील सेवा सुधारण्यासाठी काम करणाऱ्या इच्छुक स्वयंसेवी गटांना व व्यक्तींना सहभागी करून घेण्यात येईल.

**(ड) शहरी वस्त्यांसाठी (नागरी प्रकल्प) लोकाधारित देखरेख प्रक्रिया :-**

ग्रामीण क्षेत्राप्रमाणेच मुंबई तसेच नागपूर शहरात देखील निवडक कार्यक्षेत्रात ICDS योजनेवर हा उपक्रम राबविण्यासाठी शहर सुकाणू गटाची स्थापना करण्यात यावी. या गटात खालीप्रमाणे सदस्यांचा समावेश राहील.

**शहर सुकाणू गट**

➢ सबंधित विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास

➢ महानगरपालिका/नगरपालिकेच्या, महिला व बालकल्याण समितीचे सभापती

➢ कार्यकारी आरोग्य अधिकारी (E.O.H.) मुंबई महानगरपालिका

➢ वैदयकीय अधिकारी (M.O.H.), नागपूर महानगरपालिका

➢ शहर समन्वय संस्थेचे प्रतिनिधी

➢ महानगरपालिका / नगरपालिका क्षेत्रातील सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी

➢ शासकीय रुग्णालयातील N.R.C. सेंटरचे अधिक्षक

➢ संबंधित वार्डातील १ नगरसेवक (कॉर्पोरेटर)

- ➢ शहरातील आहार तज्ज्ञ
- ➢ शहरातील बालरोग तज्ज्ञ
- ➢ इतर संस्था संघटना प्रतिनिधी

**या उपक्रमाकरिता शहर पातळीवर शहर सुकाणू गटाच्या बैठकीचे आयोजन करणे.**

- दर वर्षातून किमान तीन वेळा अशी बैठक घेणे, या बैठकांचे दिवस व कार्यक्रमपत्रिका शहर पातळीवर विभागीय उपआयुक्त महिला व बाल विकास व शहर समन्वयक संस्था यांच्या समन्वयांतून ठरविणे.
- उपक्रमाच्या सुरुवातीला शहर सुकाणू समिती सदस्यासाठी शहर पातळीवर कार्यशाळेचे आयोजन करणे.
- एकात्मिक बाल विकास सेवा योजनेसंबंधी विशेष चर्चा करण्यासाठी शहर देखरेख समितीची दर चार महिन्यातून एकदा याप्रमाणे वर्षभरात किमान तीन बैठकांचे आयोजन करणे. या बैठकांचे दिवस व कार्यक्रम पत्रिका जिल्हापातळीवर शहर सुकाणू समितीचे अध्यक्ष व सचिव परस्पर समन्वयातून ठरवतील.
- ICDS सेवांवर या उपक्रमासाठी शहर पातळीवर जनसुनवाई /जनसंवाद कार्यक्रमांचे आयोजन करणे.
- या उपक्रमाचा भाग म्हणून वर्षातून किमान एकदा शहरपातळीवर ICDS यंत्रणेसोबत जाहीर मांडणी व चर्चा करण्यासाठी शहर समन्वय संस्था वर्षातून एकदा जनसुनवाई /जनसंवाद यांचे आयोजन करतील. जनसुनवाईमध्ये विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास, शहर पातळीवरील संबंधित अधिकारी, महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाचे अधिकारी, संबंधित आरोग्य केंद्राचे अधिकारी, स्वयंसेवी संस्था/संघटनांचे प्रतिनिधी, त्या भागातील नगरसेवक व वस्तीतील लोक उपस्थित राहतील.जनसुनवाई/ जनसंवादातुन पुढे आलेल्या मुद्यांवर चर्चा करून उपाययोजना करण्यासाठी शहर पातळीवरील देखरेख व नियोजन समितीची एका महिन्याच्या आत आढावा बैठक आयोजित करण्यात येईल. या बैठकीला समिती सदस्यांव्यतिरिक्त अंगणवाडी केंद्रातील सेवा सुधारण्यासाठी काम करणाऱ्या इच्छुक स्वयंसेवी गटांना सहभागी करून घेण्यात यावे.

**<u>नागरी बाल विकास प्रकल्प पातळीवरील लोकाधारित देखरेख प्रक्रियेअंतर्गत करायचे उपक्रम :-</u>**

या उपक्रमासाठी प्रकल्प पातळीवर देखरेख व नियोजन समितीची स्थापना खालील प्रमाणे राहील.

- ➢ वार्डमधून निवडून आलेले नगरसेवक (लोकप्रतिनिधी)
- ➢ बाल विकास प्रकल्प अधिकारी , एकात्मिक बाल विकास सेवा योजना
- ➢ शहर समन्वय संस्थेचे प्रतिनिधी
- ➢ वस्ती पातळीवरील समित्यांचे अध्यक्ष व सदस्य
- ➢ वस्ती पातळीवर आरोग्य केंद्राचे प्रतिनिधी
- ➢ प्रकल्प कार्यक्षेत्रातील बालरोग तज्ज्ञ व स्त्रीरोग तज्ज्ञ
- ➢ महिला संघटना किंवा बचत गटांचे प्रतिनिधी

**प्रकल्प पातळीवरील लोकाधारित देखरेख प्रक्रियेअंतर्गत करायचे उपक्रम**

(१) प्रकल्प पातळीवर या उपक्रमाच्या सुरुवातीला कार्यशाळेचे आयोजन करणे.

(२) या उपक्रमाच्या अंमलबजावणी संदर्भात चर्चा करण्यासाठी प्रकल्प पातळीवर देखरेख व नियोजन समितीच्या वर्षातून किमान तीन वेळा बैठका आयोजित करणे. या बैठकांचे दिवस व कार्यक्रमपत्रिका प्रकल्प पातळीवरील शहर समन्वय संस्था व प्रकल्प पातळीवरील प्रकल्प अधिकारी यांच्या समन्वयातून ठरविणे.

(३) या उपक्रमासाठी शहर पातळीवर जनसुनवाई/जनसंवाद कार्यक्रमांचे आयोजन करणे.

- या प्रक्रियेचा भाग म्हणून वर्षातून किमान एकदा प्रकल्पपातळीवर ICDS च्या यंत्रणेसोबत जाहीर मांडणी व चर्चा करण्यासाठी शहर समन्वय संस्था वर्षातून एकदा जनसुनवाई/जनसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करतील.
- जनसुनवाईमध्ये बाल विकास प्रकल्प, महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाचे अधिकारी, अंगणवाडी मुख्यसेविका व संबंधित आरोग्य केंद्राचे अधिकारी, महानगरपालिकेचे वैदयकीय अधिकारी व स्वयंसेवी संस्था /संघटनांचे प्रतिनिधी, त्या भागातील नगरसेवक व वस्तीतील लोक उपस्थित राहतील.

जनसुनवाई /जनसंवादातून पुढे आलेल्या मुद्यांवर चर्चा करून उपाययोजना करण्यासाठी शहर पातळीवरील देखरेख व नियोजन समितीची एक महिन्याच्या आत आढावा बैठक आयोजित करण्यात येईल. या बैठकीला समिती सदस्यांव्यतिरिक्त अंगणवाडी केंद्रातील सेवा सुधारण्यासाठी काम करण्याऱ्या इच्छुक स्वयंसेवी गटांना सहभागी करून घेण्यात यावे.

**(इ) जिल्हा पातळीवरील उपक्रम :-**

**जिल्हा सुकाणू गटाची स्थापना करणे-** एकात्मिक बाल विकास योजनेच्या देखरेख प्रक्रियेला मार्गदर्शन करणे, प्रक्रियेमध्ये व्यवस्थापकीय पातळीवर येणारे अडथळे दूर करणे, प्रक्रियेसंबंधी व धोरणात्मक महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठी जिल्हा पातळीवर जिल्हा सुकाणू गटाची स्थापना खालीलप्रमाणे राहील.

१. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (महिला व बाल कल्याण)
२. जिल्हयातील सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी
३. जिल्हा समन्वय संस्थेचे प्रतिनिधी
४. आरोग्यसेवांवर लोकाधारित देखरेख प्रक्रियेतील जिल्हा सुकाणू समितीचे एक जिल्हा परिषद सदस्य
५. आरोग्यसेवांवर लोकाधारित देखरेख प्रक्रियेतील जिल्हा सुकाणू समितीचे एक अशासकीय सदस्य

**जिल्हा पातळीवर घ्यावयाचे उपक्रम :-**

- दर वर्षातून किमान तीन वेळा अशी बैठक घेणे. या बैठकांचे दिवस व कार्यक्रमपत्रिका उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (महिला व बाल कल्याण) व जिल्हा समन्वय संस्था यांच्या समन्वयातून ठरवणे.
- या उपक्रमाच्या सुरुवातीला जिल्हापातळीवर कार्यशाळेचे आयोजन करणे.
- एकात्मिक बाल विकास सेवा योजनेसंबंधी विशेष चर्चा करण्यासाठी, जिल्हा देखरेख समितीची दर चार महिन्यातून एकदा, याप्रमाणे वर्षभरात किमान तीन बैठकांचे आयोजन करणे. या बैठकांचे दिवस व कार्यक्रमपत्रिका जिल्हा पातळीवर उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (महिला व बाल कल्याण) व जिल्हा समन्वय संस्थेचे प्रतिनिधी यांच्या समन्वयातून ठरवणे.
- **या उपक्रमासाठी जिल्हा पातळीवर जनसुनवाई/जनसंवाद यांचे आयोजन करणे :-** या प्रक्रियेचा भाग म्हणून जिल्हा स्तरावर, ICDS च्या यंत्रणेसोबत जाहीर मांडणी व चर्चा करण्यासाठी जिल्हा समन्वय संस्था वर्षातून एकदा जनसुनवाई/ जनसंवादाचे आयोजन करतील. जनसुनवाईमध्ये ICDS योजनेचे जिल्हा व तालुका पातळीवरील संबंधित अधिकारी, तसेच आरोग्य विभागाचे जिल्हा पातळीवरील अधिकारी, स्वयंसेवी संस्था/संघटनांचे प्रतिनिधी, संबंधित पंचायत राज संस्थांचे प्रतिनिधी व ग्रामस्थ उपस्थित राहतील. जनसुनवाई/ जनसंवादातून पुढे आलेल्या मुद्यांवर चर्चा करून उपाययोजना करण्यासाठी जिल्हा पातळीवरील देखरेख व नियोजन समितीची एक महिन्याच्या आत आढावा बैठक आयोजित करण्यात येईल. या बैठकीला समिती

सदस्यांव्यतिरिक्त अंगणवाडी केंद्रातील सेवा सुधारण्यासाठी काम करणाऱ्या इच्छुक स्वयंसेवी गटांना सहभागी करून घेण्यात येईल.

**(फ) राज्य पातळीवरील उपक्रम :-**

**राज्य सुकाणू समितीची स्थापना व कार्य -**

या प्रक्रियेला मार्गदर्शन करणे, प्रक्रियेमध्ये यंत्रणेच्या पातळीवर येणारे अडथळे दूर करणे, प्रक्रियेसंबधी व धोरणात्मक महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठी राज्य पातळीवर राज्य सुकाणू समितीची स्थापना खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

- प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग,
- महासंचालक, राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशन
- आयुक्त, कुटूंब कल्याण व संचालक राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, महाराष्ट्र राज्य
- आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे,
- संचालक (आरोग्य सेवा), आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य
- सह संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (संबंधित लोकाधारित देखरेख प्रक्रिया), महाराष्ट्र
- कार्यकारी आरोग्य अधिकारी (E.O.H.) मुंबई महानगरपालिका
- वैदयकीय अधिकारी (M.O.H.), नागपूर महानगरपालिका
- राज्य समन्वय संस्थेचे (साथी) प्रतिनिधी
- डॉ. अभय शुक्ला, सदस्य ए.जी.सी.ए. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (NRHM)
- डॉ. सतिश गोगुलवार, सामाजिक संस्थेचे सदस्य
- श्रीमती. शिराज प्रभू, सामाजिक संस्थेचे सदस्य
- श्री. भीम रासकर, सामाजिक संस्थेचे सदस्य
- जिल्हास्तरीय समन्वयक संस्थांचे दोन प्रतिनिधी (प्रति वर्षी २ जिल्ह्यांचे प्रतिनिधी चक्री पद्धतीने)

**राज्य सुकाणू समितीच्या दर चार महिन्यानी वर्षभरात किमान ३ बैठका घेतल्या जातील.** या बैठकांची कार्यक्रमपत्रिका व बैठकीचा दिनांक प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग, आयुक्त, महिला व बाल विकास व साथी, राज्य समन्वय यांच्या समन्वयातून ठरवण्यात येईल.

**या उपक्रमासाठी राज्य पातळीवर आढावा कार्यशाळेचे आयोजन करणे-** तालुका व जिल्हा पातळीवर होणाऱ्या जनसंवाद/ जनसुनवाईमधून पुढे आलेल्या यंत्रणेशी संबंधित व धोरणात्मक मुद्यांवर चर्चा करण्यासाठी, राज्य पातळीवर वर्षातून एकदा आढावा कार्यशाळेचे आयोजन करण्यात येईल. या कार्यशाळेचे आयोजन प्रधान सचिव, आयुक्त व राज्य समन्वय संस्थेच्यासोबत समन्वय साधून करण्यात येईल. या आढावा कार्यशाळेसाठी एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे राज्य, जिल्हा व तालुका पातळीवरील संबंधित अधिकारी व स्वयंसेवी संस्था/संघटनांचे प्रतिनिधी, संबंधित पंचायत राज संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित राहतील. या आढावा कार्यशाळेमध्ये झालेल्या निर्णयांचा पाठपुरावा राज्य सुकाणू समितीच्या बैठकीमध्ये करण्यात येईल.

अंगणवाडी केंद्रातील सेवांवर लोकाधारित देखरेख व कृती प्रक्रियेअंतर्गत उपक्रमांच्या अंमलबजावणीमध्ये प्रशासकीय अधिकारी, बाल विकास प्रकल्प अधिकारी, मुख्य सेविका, अंगणवाडी सेविका, तसेच तालुका व जिल्हा स्तरावरील ICDS चे अधिकारी व कर्मचारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी या पथदर्शी प्रक्रियेमध्ये समन्वय साधून प्रक्रियेची यशस्वीपणे अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी व लोकाधारित देखरेख प्रक्रियेसाठी प्रक्रियेतील समन्वयक संस्थांबरोबर सर्वोतोपरी सहकार्य करावे.

७. विविध स्तरावरील आढावा बैठकांचे थोडक्यात विवरण तसेच विविध स्तरावर सहभागी घटक व बैठकांचे संयोजन पुढीलप्रमाणे राहील :-

| आढावा स्तर | सहभाग | कालावधी | संयोजन |
|---|---|---|---|
| गाव /अंगणवाडी | गाव आरोग्य पोषण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती सदस्य, ICDSअंतर्गत गाव देखरेख समिती सदस्य, माता समिती सदस्य, अंगणवाडी कर्मचारी, देखरेख प्रक्रियेतील संस्था संघटनांचे प्रतिनिधी, अंगणवाडी पर्यवेक्षिका | दोन महिन्यांतून एकदा | तालुका मानसेवी कार्यकर्ता |
| बीट | निवडक गाव आरोग्य पोषण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती सदस्य, अंगणवाडी कर्मचारी, देखरेख प्रक्रियेतील संस्था संघटनांचे प्रतिनिधी, अंगणवाडी पर्यवेक्षिका | तीन महिन्यांतून एकदा | तालुका समन्वयक |
| तालुका | तालुका देखरेख व नियोजन समिती सदस्य, तालुका वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र वैद्यकीय अधिकारी, अंगणवाडी कर्मचारी, देखरेख प्रक्रियेतील संस्था संघटनांचे प्रतिनिधी, अंगणवाडी पर्यवेक्षिका, CDPO, BDO. | वर्षातून तीनदा | तालुका समन्वयक |
| जिल्हा | उपमुख्य कार्यकारी अधिकारी ,जि.प.(म. व बा.वि.) जिल्हा देखरेख व नियोजन समिती सदस्य, देखरेख प्रक्रियेतील संस्था संघटनांचे प्रतिनिधी, अंगणवाडी पर्यवेक्षिका, CDPO, BDO. | ६ महिन्यांतून एकदा | देखरेख प्रक्रियेतील समन्वयक संस्था |
| राज्य | राज्य सुकाणू समिती सदस्य, महिला व बाल विकास विभाग राज्यस्तरीय अधिकारी, देखरेख प्रक्रियेतील सहभागी संस्था संघटनांचे प्रतिनिधी | राज्य सुकाणू समिती ची आढावा बैठक वर्षातून एकदा | |
| | राज्य सुकाणू समिती सदस्य, महिला व बाल विकास विभाग राज्यस्तरीय अधिकारी, देखरेख प्रक्रियेतील सहभागी संस्था संघटनांचे प्रतिनिधी | राज्यस्तरावर व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे आढावा वर्षातून एकदा | |

गाव, बीट, तालुका, नागरी प्रकल्प, जिल्हा ते राज्यस्तरावर माहितीच्या आधारे अंगणवाडी केंद्रात देण्यात येणाऱ्या सेवांबद्दलाचा आढावा घेणे व त्या आधारे सुधारणांसाठी ठोस पाऊले उचलणे. या प्रक्रियेचा भाग म्हणून तालुका तसेच जिल्हा पातळीवर जनसंवाद, जनसुनवाई या स्वरूपातील कार्यक्रम घेण्यात येतील.

८. वरील उपक्रम एका वर्षासाठी असेल व या उपक्रमासाठी संबंधित NGO ना राज्य शासनाकडून कोणताही निधी मिळणार नाही.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक **२०१३०६१३१६५३३६२९३०** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**( उज्ज्वल ऊके )**
प्रधान सचिव

**प्रति,**

मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

सर्व मंत्री / राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
मा.मंत्री / राज्यमंत्री, (म. व बा. वि. यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
महासंचालक, राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशन, नवी मुंबई
आयुक्त, कुटूंब कल्याण व संचालक राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, महाराष्ट्र राज्य
आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे
सर्व विभागीय आयुक्त
आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका व नागपूर महानगरपालिका
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
संचालक (आरोग्य सेवा), आरोग्य संचालनालय,महाराष्ट्र राज्य
सह संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (संबंधित लोकाधारित देखरेख प्रक्रिया), महाराष्ट्र
महालेखापाल, १/२ (लेखा व अनुज्ञेयता ) मुंबई /नागपूर
महालेखापाल, महाराष्ट्र १/२ ( लेखापरिक्षा) मुंबई / नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
सर्व विभागीय उपआयुक्त (महिला व बाल विकास)
सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी ( बाल कल्याण), जिल्हा परिषद
सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी ( नागरी प्रकल्प) (आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांचे मार्फत )
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, पुणे
सहाय्यक संचालक, (वित्त व लेखा), महिला व बाल विकास, पुणे
कार्यकारी आरोग्य अधिकारी (E.O.H.) मुंबई महानगरपालिका
वैदयकीय अधिकारी (M.O.H.), नागपूर महानगरपालिका
राज्य समन्वय संस्थेचे (साथी) प्रतिनिधी
डॉ. अभय शुक्ला, सदस्य ए.जी.सी.ए. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (NRHM)
डॉ. सतिश गोगुलवार, सामाजिक संस्थेचे सदस्य
श्रीमती. शिराज प्रभू, सामाजिक संस्थेचे सदस्य
श्री. भीम रासकर, सामाजिक संस्थेचे सदस्य
महिला व बाल विकास विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती (कार्यासन -५)